| | |
|---|---|
| MHJN010011762025 | दाखल दिनांक -२९.०४.२०२५<br>नोंदणी दिनांक -०३.०५.२०२५<br>निकाल दिनांक - ३१.०७.२०२६<br>कालावधी -०१वर्ष०३महिने०२दिवस |

सत्र न्यायाधीश, जालना यांचे न्यायालयात.
(पिठासीन अधिकारी - जी. आर. ढेपे, जिल्हा न्यायाधिश-८ तथा अति. सत्र न्यायाधीश)

सत्र खटला क्र.७५/२०२५ नि.क्र.३९
(प्रथम खबर अहवाल क्र. ३७/२०२४)
(प्रथम खबर अहवाल दिनांक २९/०१/२०२४)
(अपराध कलम – ३५३, ३३२, ३७९, १८६, २०१ सहकलम ३४ भादंवि व गौण खनिज कायदयाचे कलम ३ व ४ अन्वये शिक्षेस पात्र)

महाराष्ट्र शासन
तर्फे पोलीस निरीक्षक
बदनापुर पोलीस ठाणे,
ता. बदनापुर, जि. जालना. ... अभियोगपक्ष
श्री.डी.एन. कोल्हे, सहा. सरकारी अभियोक्ता.

- विरुध्द -

१. गणेश दगडु पवार,
वय- २४ वर्षे, रा. वरुडी,
ता.बदनापुर, जि. जालना

२. अमोल कृष्णा शिंदे
वय- ४० वर्षे, रा. चौधरी कॉलनी,
चिकलठाणा, जि. छत्रपती संभाजीनगर ...आरोपी
श्री. दिपक महाजन, आरोपींचे विधिज्ञ

| | | |
|---|---|---|
| अपराध दिनांक | | २९/०१/२०२४ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | | २९/०१/२०२४ |
| दोषारोपपत्र दिनांक | | १४/०५/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याची दिनांक | | ०९/०२/२०२६ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा आरंभ झाल्याची दिनांक | | १४/०२/२०२६ |
| न्यायनिर्णयाची राखीव दिनांक | | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | | ३१/०७/२०२६ |
| शिक्षा लादलेली असल्यास दिनांक | | निरंक |

| क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष किंवा दोषी | लादलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं. च्या उद्देशाने खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | गणेश दगडु पवार | दि. ३०/०१/२०२४ | दि. ०२/०२/२०२४ | भादंवि कलम ३५३,३३२, ३७९, १८६, २०१ सहकलम ३४ तसेच कलम ३ व ४ गौ.ख.का. प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | अमोल कृष्णा शिंदे | दि. ३०/०१/२०२४ | दि. ०२/०२/२०२४ | भादंवि कलम ३५३,३३२, ३७९, १८६, २०१ सहकलम ३४ तसेच कलम ३ व ४ गौ.ख.का. प्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी -

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| अ.सा.-१ | पुनमसिंग खुशालसिंग गोलवाल | फिर्यादी |
| अ.सा.-२ | बबन उत्तमराव काळे | साक्षीदार |
| अ.सा.-३ | रमेश खंडु साळवे | पंच साक्षीदार |
| अ.सा.-४ | भाऊसाहेब तुकाराम सहाणे | तपासी अंमलदार |
| अ.सा.-५ | ज्योती राघोजी खरात | ठाणे अंमलदार |

ब. आरोपींच्या साक्षीदारांची यादी - निरंक

क. न्यायालयीन साक्षीदार - निरंक

निशाणी क्रमांकाची यादी -

अ. अभियोगपक्ष -

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | पी.१/पी.डब्ल्यु-१ | फिर्याद |
| २. | पी.२/पी.डब्ल्यु-१ | प्रथम खबर अहवाल |
| ३. | पी.१/पीडब्ल्यू-३ | जप्ती पंचनामा |

| | | |
|---|---|---|
| ४. | पी.२/पी.डब्ल्यु-३ | घटनास्थळ पंचनामा |
| ५. | डी.१/पीडब्ल्यू-३ | तहसिलदार यांचा आदेश |
| ६. | पी.१/पीडब्ल्यू-४ | मुद्देमाल पावती क्र. १ |
| ७. | पी.२/पीडब्ल्यू-४ | मुद्देमाल पावती क्र. २ |
| ८. | पी.३/पीडब्ल्यू-४ | अटक पंचनामा |
| ९. | पी.४/पीडब्ल्यू-४ | अटक पंचनामा |

ब**.** बचावपक्ष - निरंक

क**.** न्यायालयीन निशाणी **-**

| अ**.**क्र**.** | निशाणी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | १४ | दोषारोपपत्र |
| २. | १५ व १६ | आरोपींचे निवेदन |
| ३. | ३४ व ३५ | फौ.प्र.सं. कलम ३१३ अन्वये आरोपींचे निवेदन |

ड. मुद्देमाल -

| अ**.**क्र**.** | मुद्देमाल पावी क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| १. | ३०/२०२४ | एक हायवा भारत बँच कंपणीचा ज्याचा नंबर एम.एच.२१सी.बी.९२५० पिवळसर ग्रे रंगाचा |
| २. | ५५/२०२४ | अंदाजे ६ ब्रास वाळू |

<u>न्यायनिर्णय</u>

(पारीत दिनांक ३१ जुलै २०२६)

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कायदा कलम ३५३, ३३२, ३७९, १८६, २०१ सहकलम ३४ व गौण खनिज कायदयाचे कलम ३ व ४ अन्वये खटला चालविण्यात आला आहे.

<u>थोडक्यात अभियोगपक्षाचे कथन असे आहे की</u> **-**

२. फिर्यादी पुनमसिंग खुशालसिंग गोलवाल यांच्या कथनाप्रमाणे दिनांक २९/०१/२०२४ रोजी ते, पो.निरीक्षक, स.पो.उपनिरीक्षक सावंत, चालक, स.पो.उपनिरीक्षक कुंटे, पोहेकॉ काळे सरकारी जिपने पोलीस ठाणे बदनापुर हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना दुपारी ०३.३० वाजेच्या सुमारास सोमठाणा ते दाभाडी रस्त्यावर विल्हाडी फाटा येथे एक पिवळ्या रंगाचा रेतीने भरलेला हायवा मिळुन

आला. त्यांनी त्याला हात दाखवुन बाजुला थांबवले. चालकाने त्याचे नाव गणेश दगडु पवार असे सांगितले व हायवा मालकाचे नाव अमोल कृष्णा शिंदे असे सांगितले. वाहनाचा नोंदणी क्रमांक एम.एच.२१सी.बी.९२५० असल्याचे सांगितले. वाहन चालकास रेतीचे रॉयल्टी बाबत विचारणा केली असता त्याने रॉयल्टी नसल्याबाबत सांगितले. त्यावरुन चालकाने हायवा मधील रेती गिरजा नदीपात्रातून अवैध रित्या विनापरवाना चोरुन आणलेली आहे. म्हणून त्यांनी सदर हायवा पोलीस ठाणे बदनापुर येथे घेवुन चल असे सांगितले व फिर्यादी स्वतः हायवा मध्ये बसुन सदर हायवा पोलीस ठाणे बदनापुर येथे घेवून येत असतांना हायवा चालक गणेश पवार याने म्हसला पाटीवर अचानक हायवा चालू असतांना हायवा थांविण्यास सांगितले व त्याने फिर्यादीला धक्का-बुक्की करुन हायवाच्या खाली उतरुन दिले, हायवातील वाळू खाली करुन पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला व हायवा वेगाने पळुन घेवुन गेला. आरोपी गणेश याने मालक अमोल शिंदे यांच्या सांगण्यावरुन वाळू गिरजा नदीपात्रातून चोरटया मार्गाने विक्री करण्यासाठी घेवून जात असतांना मिळून आला. अशाप्रकारे आरोपींनी त्यांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण केला व वाळुची चोरी करुन गौण खनिज कायदयाचे उल्लंघन केले म्हणुन आरोपींविरुध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे.

३. सदर फिर्यादीवरुन गुन्हा क्र.३७/२०२४, दि. २९/०१/२०२४ रोजी नोंदविण्यात आला. फिर्यादीने त्याच्या पुरवणीजवाबात कथन केले की, त्यांनी फिर्यादमध्ये हायवा चालकाच्या सांगण्यावरुन हायवा मालकाचे नाव अमोल कृष्णा शिंदे व राधाकिसन आत्माराम शिंदे असे सांगितले होते. परंतु कागदपत्राअधारे त्यांना हायवा मालक अमोल कृष्णा शिंदे असल्याचे समजले. गुन्हयाचा तपासकाम पो.उप.नि.श्री.बी.टी. सहाणे यांचेकडे दिले. त्यांनी घटनास्थळाला भेट देउन दोन पंचासमक्ष पंचनामा निशाणी पी.२/पी.डब्ल्यु.३ तयार केला. वाहन व रेती जप्त करुन जप्ती पंचनामा तयार केला. आरोपींना अटक करुन अटक पंचनामा तयार केला व त्यानंतर आरोपींना न्यायालयात हजर केले. साक्षीदारांचे तपास टिपण नोंदविले. तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात

आले.

४. भादंविचे कलम ३५३ हे सत्र न्यायालयात चालविण्यात येत असल्याने, न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, बदनापुर यांनी दिनांक १०/०४/२०२५ रोजी नियमित फौजदारी खटला क्रमांक ८८/२०२४ मध्ये नि. क्रमांक १ खाली आदेश करुन सदरचे प्रकरण जिल्हा न्यायालयात वर्ग करण्यात आले.

५. आरोपींविरुध्द भादंवि कलम ३५३, ३३२,३७९,१८६, २०१ सहकलम ३४ व गौण खनिज कायदयाचे कलम ३ व ४ अन्वये दोषारोप (नि.क्र.१४) ठेवण्यात आला. त्यातील मजकूर आरोपींना वाचून दाखवला व त्यांनी गुन्हा नाकारला व संपरिक्षा करण्याची विनंती केली.

६. प्रकरणात एकूण ५ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. त्यानंतर फौजदारी प्रकिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) नूसार आरोपींचे जवाब (नि.क्र.३४ व ३५) नुसार नोंदवण्यात आले. खोटी केस दाखल केल्याचा बचाव आरोपींच्या वतीने घेण्यात आला.

७. अभियोग पक्षातर्फे अति. सरकारी अभियोक्ता श्री. डी.एन.कोल्हे व आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.दिपक महाजन यांचा युक्तिवाद ऐकला. खालील मुद्दे व त्यावरील निष्कर्ष कारणेमिमांसासह खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २९/०१/२०२४ रोजी ३.३० वाजताचे सुमारास मौजे म्हसला पाटी, सोमठाणा ते दाभाडी रोड, ता.बदनापुर, जि. जालना येथे दोन्ही आरोपींनी संगनमताने फिर्यादी, लोकसेवक यास त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून व परावृत्त करण्यासाठी त्याच्यावर हल्ला किंवा फौजदारीपात्र बळप्रयोग केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | पुढे अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वरील तारीख, वेळ व ठिकाणी, दोन्ही आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी, लोकसेवक यास त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून व परावृत्त करण्यासाठी त्याच्यावर हल्ला किंवा फौजदारीपात्र बळप्रयोग करुन दुखापत केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले काय? | |
| ३. | पुढे अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वरील तारीख, वेळ व ठिकाणी, दोन्ही आरोपींनी संगनमत करुन अप्रमाणिक हेतूने, शासणाच्या परवानगी शिवाय ५/९ ब्रास वाळुची चोरी केल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ४. | पुढे अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वरील तारीख, वेळ व ठिकाणी, दोन्ही आरोपींनी संगनमत करुन फिर्यादी लोकसेवक यांस त्याचे शासकीय कर्तव्य करण्यापासुन परावृत्त करण्यासाठी त्याच्या कामकाजात अडथळा निर्माण केल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही. |
| ५. | पुढे अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वरील तारीख, वेळ व ठिकाणी, दोन्ही आरोपींनी संगनमत करुन गुन्हा कलम ३५३, ३७९ अन्वये गुन्हा केल्याचे पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे, अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | नाही |
| ६. | पूढे अभियोगपक्ष हे सिध्द करतो काय की, वरील तारीख, वेळ व ठिकाणी, दोन्ही आरोपींनी बेकायदेशीररित्या चोरीने प्राप्त केलेली वाळु विक्री करण्याच्या उद्देशाने वाळुची हायवा क्र. एम.एच.२१सी.बी.९२५० मध्ये वाहतूक केली व गौण खनिज कायदयाचे कलम ३ व ४ नूसार गुन्हा केला काय ? | नाही. |
| ७. | काय आदेश ? | आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते. |

<u>कारणमिमांसा</u>

<u>मुद्दा क्र.१ ते ६ करिता</u> -

८. मुद्दे क्रमांक १ ते ६ हे एकमेकांशी निगडीत असल्याने एकत्रीतरित्या विचारात घेण्यात आले आहेत. सरकार पक्षाच्या युक्तीवादा प्रमाणे फिर्यादी हा

त्याचे शासकीय कर्तव्य बजावत असतांना आरोपींनी संगनमत करुन त्यांच्या कर्तव्यात अडथळा निर्माण केला, त्यास धक्काबुक्की करुन जखमी केले, वाळुची चोरी केली, पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केला व गौण खनिज कायदयाचे उल्लंघन केले. इतर साक्षीदारांचा पुरावा फिर्यादीच्या पुराव्यास पुष्टी देणारा व विश्वास ठेवण्याइतपत पुरेसा आहे. आरोपींविरुध्द् गुन्हयाशी संबंधीत पुरेसा पुरावा आहे.

९. आरोपींच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, आरोपींविरुध्द गुन्हयाशी संबंधीत ठोस पुरावा उपलब्ध नाही. स्वतंत्र प्रत्यक्षदर्शी व पंच साक्षीदारांचा पुरावा आलेला नाही. सर्व साक्षीदार हे पोलीस कर्मचारी असल्याने स्वतंत्र पुराव्या अभावी त्यांचा पुरावा उपयुक्त नाही. घटनास्थळावरील हजर साक्षीदारांचे बयाण नोंदविले नाही अथवा त्यांना तपासण्यात आले नाही. आरोपी क्र. २ विरूध्द कोणतेही कथन आलेले नाही. तरी आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे.

१०. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्याचा भार अभियोग पक्षावर आहे. फिर्यादी, पुनमसिंग गोलवाल, सा.क्र.१ यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ते व ईतर पोलीस कर्मचारी सरकारी वाहनाने गस्त करीत असतांना दुपारी ०३.३० वाजता विल्हाडी फाटा येथे एक पिवळया रंगाचा रेतीने भरलेला हायवा क्र. एम.एच.२१सी.बी.९२५० मिळून आला. सदर वाहन आरोपी गणेश दगडु चालवित होता. त्याच्याकडे रॉयल्टी नव्हती. सदर रेती गिरजा नदीपात्रातुन अवैधरित्या चोरटी वाहतूक करुन आणली असल्याची त्यांना खात्री झाली. श्री. भागवत साहेब यांनी फिर्यादीस हायवा पोलीस स्टेशन येथे आणायला सांगितले. काही अंतरावर, म्हसला पाटीवर आरोपी गणेश याने चालत्या वाहनातून रेती खाली करण्यास चालु केली व त्याने हायवा रोडच्या कडेला घेतला व हायवातील रेती खाली करुन घेवून पळून गेला. हायवा मालकाचे नाव त्याने अमोल शिंदे सांगितले व राधाकिशन यांच्या सांगण्यानुसार हायवातील रेती खाली करुन पळुन गेला. त्यांनी शासकीय कामकाजात अडथळा केला, म्हणून त्याने फिर्याद दाखल केली.

११. आरोपीच्या वतीने फिर्यादीचा उलटतपास घेण्यात आला. त्याच्या उलटतपासात असे आले आहे की, घटनास्थळापासून पोलीस ठाणे २० किलोमिटर अंतरावर आहे. घटनेच्या दिवशी पेट्रोलिंगवर गेल्याची नोंद स्टेशन डायरीमध्ये घेतली किंवा नाही, हे सांगता येणार नाही. तसेच पुढे फिर्यादीच्या पुराव्यात आले आहे की, भागवत साहेब यांनी त्यास हायवा पोलीस स्टेशन येथे घेण्यास सांगितले, काही अंतरावर आरोपी क्र. १ ने रेती खाली करण्यास सुरुवात केली, त्याने हायवा रोडच्या कडेला घेतला व त्यांना धक्का-बुक्की करुन, रेती खाली करुन हायवा घेवून गेला, हायवा चालक यांनी हायवा मालक राधाकिसन याच्या सांगण्यावरुन रेती खाली करुन पळुन गेला ईत्यादी बाबी आलेल्या आहेत. वास्तविक पाहता सदर बाबी फिर्यादीमध्ये नमुद नाहीत. त्या बाबी फिर्यादमध्ये का नमुद नाहीत, याचे स्पष्टीकरण साक्षीदाराने दिलेले नाही. त्यामुळे सदर साक्षीदार न्यायालयासमोर अतिरीक्त कथन करीत असल्याचे दिसून येते व अभियोग पक्षाच्या कथनाबाबत संशय दिसून येत आहे. सदर साक्षीदाराने म्हसला पाटीवर चहाच्या टप-यावर लोक थांबलेले असतात असे नमुद केले आहे. तसेच म्हसला पाटीवर कमीत कमी १५ ते २० मिनीटे गेली असतील याबाबत त्यास सांगता आले नाही. परंतु सदर फाटयावरील स्वतंत्र साक्षीदाराचे बयाण नोंदविले नाही, अथवा त्यांना प्रकरणात तपासण्यात आलेले नाही.

१२. साक्षीदार क्र. २ बबन उत्तमराव काळे, पो.कॉ. यांचा पुरावा फिर्यादीच्या पुराव्याप्रमाणेच आलेला आहे. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, सदर घटनास्थळावर लोकांची वर्दळ असते व चहाच्या हॉटेल आहेत. गस्तीला जाण्यापुर्वी स्टेशन डायरीला नोंद घेतली नव्हती. सदर घटना त्यांच्या समक्ष घडली नाही, ही बाब त्यांनी अमान्य केली आहे. जरी सदर साक्षीदाराचा पुरावा फिर्यादीच्या पुराव्यास पुरक स्वरुपाचा असला तरी फिर्यादीच्या पुराव्यात अनेक विसंगती आलेल्या आहेत. त्यामुळे सदर साक्षीदाराचा पुरावा फिर्यादीच्या पुराव्यास तितकासा उपयुक्त स्वरुपाचा नाही.

१३. अभियोग पक्षाची साक्षीदार क्र. ५ ज्योती खरात यांचा पुरावा औपचारीक स्वरुपाचा आहे. त्यांनी सदर फिर्याद नोंदवून गुन्हा क्र. ३७/२०२४ नोंदविला व तपास श्री. बी.टी. सहाणे यांच्याकडे दिला.

१४. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ४ भाऊसाहेब तुकाराम सहाणे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांनी हायवा गाडी एम.एच.२१सी.बी. ९२५० वाहनाचा दोन पंचासमक्ष जप्ती पंचनामा पी.१/पी.डब्ल्यु-३ तयार केला. त्यांनी पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा पी.२/पी.डब्ल्यु-३ तयार केला. घटनास्थळावरुन १२००० किंमतीची वाळू जप्त केली. साक्षीदार क्र. ३ रमेश खंडु साळवे यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांच्या समक्ष सदर जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनामा तयार केला होता. साक्षीदारांच्या पुराव्यात दि. ३०/०१/२०२४ रोजी पोलीस ठाणे बदनापुरच्या आवारात सदर हायवाचा जप्ती पंचनामा केल्याचे दिसून येत आहे.

१५. सदर खटल्यात पोलीस साक्षीदारांशिवाय व ईतर कर्मचा-यांशिवाय ईतर कोणतेही स्वतंत्र साक्षीदार तपासलेले नाहीत. वास्तविक पाहता सदर गस्त डयुटीवर फिर्यादी व त्यांच्यासोबत ईतर चार पोलीस कर्मचारी गस्तीवर होते. सदर ठिकाणावरून पोलीस ठाणे कमी अंतरावर होते. अशा परिस्थितीत आरोपी हा चालत्या वाहणातून कथन केल्याप्रमाणे पोलीस कर्मचा-यास धक्का-बुक्की करुन, हायवातील रेती खाली करुन पळून गेला या कथनाबाबत विश्वासहर्ता वाटत नाही. शिवाय आरोपी क्र. २ यांची कोणतीही भुमिका दिसून येत नाही. फिर्याद देण्यास झालेल्या विलंबाबाबत कोणतेही स्पष्टीकरण नमुद करण्यात आलेले नाही. अशा परिस्थितीत उपलब्ध पुरावा आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द होण्यास पुरेसा नाही. करिता आरोपींनी फिर्यादीस सरकारी कामात अडथळा केला, धक्काबुककी केली व वाळुची चोरी करुन गौण खनिज कायदयाचे उल्लंघन केले याबाबत कोणताही ठाम व योग्य पुरावा दिसुन येत नाही. उपलब्ध पुरावा एकमेकांशी सुसंगत, मिळताजुळता व विश्वसनीय दिसुन येत नाही. करिता आरोपींविरुध्द गुन्हयाचे मुख्य घटक सिध्द झालेले नाही. म्हणुन मुददा क्र. १ ते ६ ची उत्तरे नकारार्थी

देण्यात येत आहेत.

<u>मुद्दा क्र.०७</u>

१६. वरील विवेचनावरुन अभियोगपक्ष आरोपींविरुध्दचे संशया पलीकडे आरोप सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. त्यामूळे आरोपीस संशयाचा फायदा प्राप्त होतो व आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. जप्त टिप्पर क्र. एम.एच२१सी.बी. ९२५० अर्जदार अमोल कृष्णा शिंदे यास सुपुर्दनामा बॉन्डवर परत केल्याचे उपलब्ध बॉन्डवरुन दिसुन येत आहे. म्हणून मुद्दा क्रमांक ७ करिता खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

<u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१.गणेश दगडु पवार व आरोपी क्र. २. अमोल कृष्णा शिंदे यांना भारतीय दंड विधान कलम ३५३, ३३२, ३७९, १८६, २०१ सहकलम ३४ व गौण खनिज कायदयाचे कलम ३ व ४ या आरोपांमधून फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २३५(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे जातमुचलके व बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत. |
| ३. | आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नूसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/- चे बंधपत्र व जामीनपत्र दाखल करावे. सदरचे बंधपत्र व जामीनपत्र हे पूढील सहा महिन्याच्या कालावधीसाठी कायम ठेवण्यात येतात. |
| ४. | अपील कालावधीनंतर सुपुर्तनामा बॉन्ड रदद समजण्यात यावा. जप्त वाहन क्र. एम.एच.२१सी.बी.९२५० अर्जदार अमोल कृष्णा शिंदे यास सुपुर्दनामा बॉन्डवर परत केल्याने, त्याचा ताबा त्यांच्याकडेच कायम ठेवण्यात येतो. |
| ५. | अपील कालावधीनंतर प्रकरणातील जप्त मुद्देमाल अंदाजे ६ ब्रास वाळूची विल्हेवाट अद्याप लावली नसल्यास त्या वाळुची कायदेशीर विल्हेवाट लावण्यात यावी. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed
by GURLING
RAMLING DHEPE
Date: 2026.07.31
15:57:03 +0530

दिनांकः३१/०७/२०२६

**( जी. आर. ढेपे )**
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, जालना.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – अक्षय ईश्वर देशपांडे
न्यायालयाचे नांव – जिल्हा न्यायाधीश-८ तथा अति. सत्र न्यायालय

लघुलेखक